**प्रसिद्धी पत्रक**

## महिलांच्या व्यावसायिक प्रशिक्षणाचे दुसरे शिबीर सत्र संप्पन्न
## निती आयोगामार्फत, मिरा भाईंदर मनपा फराळ सखी – "अवॉर्ड टू रिवॉर्ड" उपक्रम

**मिरा-भाईंदर, १७ जानेवारी २०२५:** निती आयोगाच्या उद्यम मंचाद्वारे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या फराळ सखी – "अवॉर्ड टू रिवॉर्ड" या उपक्रमाचे दुसरे शिबीर शुक्रवार दिनांक १७ जानेवारी २०२५ रोजी संपन्न झाले. मिरा भाईंदर महानगरपालिकेने दिवाळीत राबविलेल्या फराळ सखी उपक्रमाला केंद्र शासनाच्या निती आयोगाची मान्यता मिळाली असून, आयोगाच्या महिला उद्यम मंचाद्वारे फराळ सखी – अवॉर्ड टू रिवॉर्ड या उपक्रमांतर्गत फराळ सखीसाठी निवड झालेल्या २५ महिलांचे ९ जानेवारी २०२५ पासून प्रशिक्षण सुरू झाले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर (भा.प्र.से) शहराच्या विकासासाठी नेहमी नावीन्यपूर्ण संकल्पना राबवत असतात. महिलांना कायमस्वरूपी उद्योग, रोजगार आणि बाजारपेठ मिळावी, यासाठी 'फराळ सखी' हा उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत महिलांना व्यवसायिक पद्धतीने फराळ बनवून त्याची विक्री करण्यासाठी महापालिकेने स्वतंत्र यंत्रणा उभारली होती. या उपक्रमाला नागरिकांना उदंड प्रतिसाद दिला, महिलांना तब्बल ३ टन खाद्यपदार्थांची विक्री केली होती.

या प्रशिक्षण शिबीरात व्यवसाय व्यवस्थापन, मार्केटींग-ब्रँडिंग, पैशांचे व्यवस्थापन, गुंतवणूक, व्यावसायिक कर्ज, अन्न-पदार्थ व्यवसायातील कायदे, पॅकेजिंग, वितरण आदी विषयांवर चार दिवसीय प्रशिक्षण देण्यात येत आहे. या प्रशिक्षणामुळे महिलांना व्यवसाय कसा करावा, त्याची गुणवत्ता कशी वाढवावी हे समजणार असून, भविष्यात फराळी सखी हा ब्रँड बनून, या महिला उद्योजक होणार आहे, असा विश्वास मनपा आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर (भा.प्र.से) यांनी व्यक्त केला आहे.

**चौकट**

फराळ सखी – अवॉर्ड टू रिवॉर्ड अंतर्गत झालेल्या दुसऱ्या सत्रात, वित्त आणि पत व्यवस्थापन- गुंतवणूक आणि व्यवसाय कर्ज या विषयावर डिजिटल अकाऊंटींग क्लबचे संस्थापक सीए कुणाल कुमार व सीए पिटर रिचर्ड यांनी प्रशिक्षण दिले. या सत्रात, कुमार यांनी व्यवसायाचे व्यवस्थापन करताना पैशांचे व्यवस्थापन कसे करावे हे शिकवले. यासह, आर्थिक नियोजनाची मूलतत्त्वे, व्यवसाय व बचतीसाठी बजेट कसे बनवावे, कमी जोखमीच्या गुंतवणुकीचे पर्याय आणि सरकारी योजना, कर्ज घेताना कर्जाच्या अटी कशा समजून घ्याव्यात तसेच अर्ज करण्याची प्रक्रिया, उत्पन्न, खर्च आणि साठा यांची नोंद, जीएसटी, उत्पन्न कर आणि लघुउद्योगांसाठी लागू होणाऱ्या कायदेशीर बाबी आदी सर्व मुद्द्यांवर सविस्तर माहिती या सत्रात समजावून सांगण्यात आली आहे.